*औंढा नागनाथ विकास आराखड्यासाठी नावीन्यपूर्ण प्रस्ताव सादर करा - अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार*

================================================================

- मुंबई दि. ११/ बारा ज्योर्तिलिंगापैकी आठवं ज्योर्तिलिंग असलेल्या श्रीक्षेत्र औंढा नागनाथ च्या विकासासाठी नावीन्यपूर्ण कामांचा समावेश असलेला परिपूर्ण प्रस्ताव सादर करा अशा सूचना आज वित्तमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिल्या.

- बैठकीस आमदार डॉ. संतोष टारफे यांच्यासह हिंगोलीचे जिल्हाधिकारी व इतर अधिकारी उपस्थित होते. आज जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी वित्तमंत्र्यांसमोर श्रीक्षेत्र औंढा नागनाथ विकास आराखड्याचे सादरीकरण केले त्यावेळी ते बोलत होते.

- आराखड्यात करावयाची कामे ही उत्तम दर्जाची आणि नावीन्यपूर्ण कल्पनांनी पूर्ण केली जावीत असे सांगून अर्थमंत्री म्हणाले की, हे मंदिर १३ व्या शतकात बांधले गेले असून ते राज्य पुरातत्व विभागाच्या संरक्षित वास्तूत येते. येथे येणाऱ्या भाविकांची संख्या लाखो मध्ये आहे. मंदिराचे महत्व आणि भाविकांच्या सोयी-सुविधा विचारात घेऊन आराखड्यात कामांचा समावेश करावा, परिसरातील दुकानांच्या संरचनेत एकसूत्रता असावी, बेलफूल आणि निर्माल्यापासून खत निर्माण करण्याची आणि वाटपाची यंत्रणा विकसित केली जावी, पिण्याचे स्वच्छ पाणी उपलब्ध व्हावे, दिव्यांग आणि वृद्धांना मंदिरात सहजतेने जाता येईल अशी व्यवस्था असावी, पोलीस मदत केंद्र, दर्शन रांग, होमकूंड, माहिती फलक, पादत्राणे ठेवण्याची व्यवस्था, डिजिटल लॉकरची व्यवस्था, सुंदर वास्तुशिल्पे, स्वागत कमान, अनुरूप अशी कम्पाऊंड वॉल, त्यावर ज्योर्तिलिंगाचे महत्व सांगणारी माहिती देता येईल का, ओम नम: शिवाय चा जप करणारा नंदी, सौर उर्जा उपकरणे, अद्ययावत बस स्थानक, पोलीस स्टेशन, १२ ज्योर्तिलिगाच्या प्रतिकृती, महादेवाची भव्य मूर्ती, अशा विविध सोयी-सुविधायुक्त कामांचा त्या आराखड्यात समावेश असावा. रुद्राक्ष, बेल, तुळस, पांढऱ्या फुलांच्या झाडांची लागवड येथे केली जावी, त्रिशूळ, डमरू, चंद्र, याचा नावीन्यपूर्ण पद्धतीने वापर व्हावा, ॲम्पीथिएटर, लेझर शो करता येईल का पहावा असेही श्री. मुनगंटीवार यावेळी म्हणाले.